महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/राष्ट्रीय मतदार दिन/२०२२/२७४ दिनांक : १७.०१.२०२२.

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : दिनांक २५ जानेवारी रोजी राष्ट्रिय मतदार दिन आयोजित करणेबाबत..

संदर्भ : १) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि//राष्ट्रीय मतदार दिन/२०२२/७८ दि. ०५.०१.२०२२.

२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, म.रा. यांचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१५३/विशि-३, दिनांक २३.०७.२०२१.

३) मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र संकीर्ण २०२१/प्र.क्र.८००/२१/३३ दिनांक २१.१२.२०२१.

४) प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे क्र.२०२१/प्र.क्र.८००/२१/३३ दि. १२-०१-२०२२

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भ क्रमांक १ च्या परिपत्रकानुसार सर्व संस्थांना यापूर्वी **दिनांक २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन** आयोजित करणेबाबत सूचित करणेत आलेले आहे. त्या अनुषंगाने आपणांस कळविणेत येते की, संदर्भ क्रमांक १ च्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्ट-६ मध्ये नमूद केलेनुसार संस्था स्तरावर वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे. त्यानुसार संस्थास्तरावर सोबत जोडलेल्या परिशिष्ट-६ प्रमाणे काही स्पर्धा ऑनलाईन पध्दतीने दि. २० जानेवारी, २०२२ पर्यंत आयोजित करुन मूल्यमापन संस्थास्तरावर करावे आणि विजेते स्पर्धक निवडावेत व प्रत्येक संस्थेतून प्रथम क्रमांक ज्या विजेत्याला मिळाला असेल त्याचे नाव व तपशिल सोबत जोडलेल्या गुगल फार्म लिंक वर भरण्यात यावा. विजेत्यांना मा. जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच इतर विजेत्यांना संस्था स्तरावर २५ जानेवारी २०२२ रोजी पारितोषिके देण्यात यावीत, याच दिवशी परिशिष्ट ७ मधील राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून मतदारांनी शपथ घ्यावयाची आहे सोबत परिशिष्ट ७ जोडत आहे.

तसेच सर्व संस्थाप्रमुखांना असे सूचित करणेत येते की, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या दि. १४-०१-२०२२ च्या ई-मेल व्दारे प्राप्त संदर्भ क्र ४ च्या अनुषंगाने, **मुद्दा क्र ६, ७ व ८** नव्याने आलेले आहेत. त्याचीही माहिती या कार्यालयास २० जानेवारी, २०२२ पर्यंत या विभागीय कार्यालयास info.dteropune@gmail.com या ई-मेल आयडी वर न चुकता सादर करावी.

सोबत - परिशिष्ट-६, परिशिष्ट-७, संदर्भ क्र ४ चे पत्र

(डॉ. [illegible])
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

E:\student section\Election Commision २५-१-२२\Cicular for National Voter Day.docx

# वरिष्ठ महाविद्यालयांसाठी विविध स्पर्धा आणि विषयांची यादी

## अ. निबंध

१) मी मताधिकार बजावणार कारण .....
२) मताधिकाराची सक्ती करावी का?
३) सोहळा लोकशाहीचा जागर मताधिकाराचा
४) हक्क वंचितांचे मार्ग मताधिकाराचा
५) मी नव्या युगाचा / युगाची मतदार
६) शहरी मतदारांची अनास्था – कारणे आणि उपाय
७) मी माझं मत विकणार नाही!
८) एका बोटावरच्या शाईची किंमत?

## आ. मीम

१) निवडणुकीच्या दिवशी फिरायला जाणारे लोक
२) सगळी व्यवस्था भ्रष्ट आहे असे समजून मताधिकार न बजावणारे लोक
३) मतदार नोंदणी न करणारे लोक
४) अठराव्या वर्षाची जबाबदारी - मतदार नोंदणी
५) माझ्या महाविद्यालयातील १८ वर्षे पूर्ण केलेल्या युवांनी मतदार नोंदणी करावी म्हणून...

## इ. लघुपट

१) गोष्ट लोकशाहीची
२) मताधिकार हा माझा कायदेशीर आधिकार
३) सार्वत्रिक प्रौढ माताधिकाराचे महत्व
४) अपंगांच्या मताधिकाराचे महत्व आणि आवाहन
५) तृतीय पंथीयांच्या मताधिकाराचे महत्व आणि आवाहन

## ई. वक्तृत्व

१) आपल्या देशात लोकशाही रुजली आहे का?
२) ..म्हणून मी मताधिकार बजावतो/बजावते!
३) लोकशाही आणि तरुण मतदार
४) व्यवस्था बदलाचा राजमार्ग : मताधिकार
५) मताधिकाराची सक्ती करावी का?
६) सक्षम लोकशाहीची पहिली पायरी - मतदार नोंदणी

## उ. चित्रकला

१) १८ वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन
२) स्त्रियांना मतदान नोंदणीचे आवाहन
३) अपंगांच्या मताधिकाराचे महत्व आणि आवाहन
४) तृतीय पंथीयांच्या मताधिकाराचे महत्व आणि आवाहन

## ऊ. घोषवाक्य

१) सर्वोत्कृष्ट शासनपध्दती - लोकशाही
२) १८ वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन
३) मताधिकाराचे महत्व

## ए. गाणे

१) लोकशाही शासनपध्दतीचे फायदे
२) १८ वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन
३) सक्षम लोकशाहीसाठी मताधिकाराचे महत्व

परिशिष्ट ७

राष्ट्रीय मतदार दिवस
मतदारांसाठी प्रतिज्ञा

## मराठी

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परपरांचे जतन करु आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु."

## हिंदी

"हम, भारत के नागरिक, लोकतंत्र मे. अपनी पूर्ण आस्था रखते हुए यह शपथ लेते हैं की हम अपने देश की लोकतांत्रिक परम्पराओंकी मर्यादा को बनाए रखेंगे तथा स्वतंत्र, निष्पक्ष एवं शांतिपूर्ण निर्वाचन की गरिमा को अक्षुण्ण रखते हुए, निर्भीक होकर, धर्म, वर्ग, जाति, समुदाय, भाषा अथवा अन्य किसी भी प्रलोभन से प्रभावित हुए बिना सभी निर्वाचनो में अपने मताधिकार का प्रयोग करेंगे."

## English

**"We, the citizens of India, having abiding faith in democracy, hereby pledge to uphold the democratic traditions of our country and the dignity of free, fair and peaceful elections, and to vote in every election fearlessly and without being influenced by considerations of religion, race, caste, language or any inducement."**

****************

अ.शा. पत्र क्र.:- संकीर्ण-२०२१/प्र.क्र.८००/२१/३३
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय (विस्तार),
मदाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- १२ जानेवारी, २०२२.

श्रीकांत देशपांडे
प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

**विषय :- व्हिडीओ कॉन्फरन्सचे आयोजन करण्याबाबत.**

**संदर्भ :- भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४९१/ECI/DO/FUNC/SVEEP-I/NVD/२०२१, दि.११.०१.२०२२**

प्रिय विकास,

दि. २५ जानेवारी, २०२२ रोजी राज्यासह देशभरामध्ये १२ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात येणार आहे. भारत निवडणूक आयोगाने शाळा, महाविद्यालय, शैक्षणिक संस्थांमध्ये राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम साजरा करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने महाविद्यालय व विद्यापीठ मध्ये राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व विद्यापीठासोबत सोमवार दिनांक १७.०१.२०२२ रोजी दु.०१.०० वा. व्हिडीओ कॉन्फरन्स आयोजित केल्यास मी आपला आभारी राहीन. सदर व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये पुढील मुद्दांवर चर्चा करण्यात येईल.

१. सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम साजरा करणे.
२. राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमाच्या दिवशी निवडणूक विषयक शपथ घेणे.
३. राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम दिवशी विविध स्पर्धा आयोजित करणे. उदा. वाद विवाद स्पर्धा, चर्चा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पेंटींग.
४. सर्व विद्यापीठांमध्ये श्रेयांकन अभ्यासक्रम लागू करणे व त्यामार्फत विद्यार्थ्यांना मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय मध्ये इंटर्नशिप देणे.
५. विद्यापीठांमध्ये व त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करणे व सक्षम करणे.
६. NSS च्या उपक्रमांमध्ये मतदार जागृतीवरील उपक्रमांचा समावेश करणे.
७. विद्यार्थी संसद सारख्या उपक्रमांमध्ये लोकशाही सक्षमीकरण, निवडणूक प्रक्रिया, मतदार जागृती यांसारख्या विषयांचा समावेश करणे. विद्यार्थी संसद घेताना अभिरूप मतदानाचा समावेश करणे.
८. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत निवासी तरूणांची शिबीरे आयोजित करण्यात येईल. त्यासाठी निवड प्रक्रिया केली जाणार असून यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे.
९. १८ वर्ष पुर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेसोबत जोडून घेणे. महाविद्यालयात मतदार नोंदणीसाठी विशेष शिबीरांचे आयोजन करणे.
१०. राज्यस्तरीय / जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे. महाविद्यालयातही निवडणूक साक्षरता मंडळांतर्गत लोकशाही सक्षमीकरण, मतदार जागृती विषयांवर विविध स्पर्धांचे आयोजन करणे

आपला स्नेहांकित

(श्रीकांत देशपांडे)

प्रति,
श्री विकास चंद्र रस्तोगी
अपर मुख्य सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.